**स.फौ.के. नं. ४०३/२०२१**

**नि. क्र. ३४**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – तानाजी शिवाजी पाटील,

**वय** – ४३ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस शिपाई ब. क्र. ५५६),

**सध्या नेमणूक** – पोलीस ठाणे देवरुख, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता कुमारी एस. आर. वनकर यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक १७/०३/२०२१ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी देवरुख पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी मला सदर पोलीस ठाण्यातील क्लेम क्रमांक ३६/२०२१ मधील नमूना मुद्देमाल रासायनिक पृथःकरणाकरीता न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापुर येथे जमा करण्यासाठी सांगितले.

**०२**. त्यानंतर मी मुद्देमाल कारकुनाकडून १८० मिली मापाची सिलबंद गावठी हातभट्टी दारुची बाटली व दोन रिपोर्ट घेवुन कोल्हापुर येथे प्रयोगशाळेत गेलो. त्यानंतर सदर ठिकाणी नमुना मुद्देमाल जमा करुन एका रिपोर्टच्या प्रतीवर पोहोचची स्वाक्षरी घेवुन ती प्रत तपासीक अंमलदार पो.हे.कॉ. श्री. जाधव यांच्याकडे जमा केली. (साक्षीदारास पोहोच पावतीची प्रत दाखविली). ती तीच असून त्यावर प्रादेशीक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापुर यांच्याकडील लिपीकाची पोहोच म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर **<u>पावतीला निशाणी ३५</u>** देण्यात येते).

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जी. आर. गानु यांचेकडून</u> –**

**०३**. सदर दिवशी मी कर्तव्यावर हजर असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा मी तपासीक अधिकारी यांच्याकडे जमा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नमुना मुद्देमाल व

रिपोर्ट मला कोणत्या तारखेला देण्यात आला याचा कागदोपत्री पुरावा मी दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कोल्हापूरला गेल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा जसे की, प्रवासाचे तिकीट वगैरे तपासीक अधिकारी यांच्याकडे दिलेला नाही.

**०४**. हे म्हणणे खरे नाही की, नमुना मुद्देमाल मी कोल्हापूर येथील रासायनिक प्रयोगशाळेत जमा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रयोगशाळेकडुन पोहोच पावती दिल्याचे मी खोटे नमूद करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तपासाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे हे दाखविण्याकरीता तपासीक अधिकारी यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.06.25 17:38:33 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दिनांक –२५.०६.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 25/06/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 25/06/2025 |
| Evidence uploaded on | : | 25/06/2025 |